उपमुख्यमंत्री अजित पवार : यांच्याकडून उपाययोजनांचा आढावा

चाकण परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : पुणे जिल्ह्यासह राज्याच्या औद्योगिक विकासात महत्त्वाचे योगदान असणाऱ्या चाकण (ता. खेड) परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी रहदारीच्या ठिकाणी वाहनतळ उपलब्ध करून देणे, राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे हटविणे, कंपन्यांमधील कर्मचारी येण्या-जाण्याच्या वेळांमध्ये औद्योगिक परिसराबाहेर अवजड वाहने थांबविणे आदी उपाययोजना तातडीने कराव्यात. चाकणकरांची वाहतूक कोंडीतून मुक्तता करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पुण्याच्या जिल्हाधिकारी आणि पिंपरी-चिंचवडच्या पोलीस आयुक्तांनी स्वत: परिसराची पाहणी करावी आणि तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि. ३१ जुलै) दिले.

चाकण वाहतूक कोंडी समस्येबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबतचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबई येथे मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात आढावा घेतला. यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार दिलीप मोहिते पाटील, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव सदाशिव साळुंखे आदी उपस्थित होते. विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे विभागीय अधिकारी अंशुमन श्रीवास्तव, पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे, पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, चाकण येथील तळेगाव चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असून येथील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीस विभागाने प्राधान्याने अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. विनापरवाना रिक्षांची संख्या आटोक्यात आणावी. वाहतूक चौकीस तास नियंत्रित करून वाहनचालकांना शिस्त लावावी. सार्वजनिक बांधकाम विभाग, एमआयडीसी, महसूल, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस अशा सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने वाहतूक कोंडीवर तोडगा काढावा. परिसरातील रस्ते, महामार्गावरील सर्व प्रकारची अतिक्रमणे तातडीने काढून टाकावीत. अतिक्रमण काढण्याची कारवाई नियमितपणे करावी. चाकण परिसरातून जाणाऱ्या चार पदरी महामार्गाच्या बाजूला असणारी मोकळी जागा एमआयडीसीने उपलब्ध करून द्यावी. त्याठिकाणी महामार्ग प्राधिकरणाने सहा पदरी रस्त्याचे काम प्राधान्याने सुरु करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, नागरिकांना कुठल्याही प्रकारच्या वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जाऊ लागू नये याची खबरदारी घेऊन तळेगाव चौकातील वाहतूक सुयोग्य पद्धतीने पर्यायी मार्गावर वळवावी. सकाळी तसेच सायंकाळी कंपन्या सुटण्याच्या कालावधीत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. ही बाब लक्षात घेऊन या गर्दीच्या वेळी वाहतूक नियंत्रणासाठी पीएमआरडीएने भंडारा डोंगराच्या बाजूला असणाऱ्या गायरान जमिनीवर जड वाहनांना थांबवून ठेवण्यासाठी ट्रक टर्मिनसची सुविधा उभारावी, अशी सूचना त्यांनी केली.

वाहनतळांची संख्या वाढविण्याबाबत संगोताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, चाकण परिसरात येणाऱ्या अवजड वाहनांची संख्या जास्त आहे. त्यांच्यामुळे विविध चौकांत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. ही समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी एमआयडीसीच्या हद्दीतील ट्रक टर्मिनलसाठीची नियोजित जागा पीएमआरडीएला हस्तांतरित करावी. त्या जागेवर वाहनतळ विकसित करण्याचे काम पीएमआरडीएने सुरु करावे. आपल्याकडे येणाऱ्या ट्रक, कंटेनरच्या पार्किंगची व्यवस्था आपल्या आवारातच करण्याबाबत संबंधित कंपन्यांना बंधनकारक करण्यात यावे. वोक्सवॅगन कंपनीसमोर असणाऱ्या पाझर तलावाच्या जागेचा वापर करून नवीन वाहनतळ उभारावे. त्यातून मध्यवर्ती भागात वाहने उभी करण्यास जागा उपलब्ध होईल, असे निर्देशही त्यांनी दिले.

चाकण परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी नवीन रस्त्यांसह रुंदीकरणासाठी ५७२ कोटींचा निधी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीचा वापर करून गतीने कामे करून घ्यावीत. औद्योगिक परिसरातील कचऱ्यासह आसपासच्या ५७ गावांमधील कचऱ्याचे स्थानिक परिसरात प्रक्रिया करण्यासाठी एमआयडीसीने ४ एकर जागा उपलब्ध करून द्यावी. या जागेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कचरा प्रक्रिया केंद्र उभे करावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

जिल्हा न्यायालयाने व्हॉटसॲप कॉलींगद्वारे केली नुकसानभरपाई मंजूर

नारायणगांव: राजगुरूनगर येथील जिल्हा न्यायालयाने व्हॉटसॲप कॉलींगद्वारे सुनावणी घेत अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या एका चोवीस वर्षीय तरुणाच्या जेष्ठ नागरिक असलेल्या नातेवाईकांना नुकसानभरपाई मंजूर करुन दिली याबाबत माहिती अशी की, न्याय मिळविण्यासाठी एखादी पक्षकारांना न्यायालयाची पायरी चढावी लागते मात्र जेष्ठ नागरिकांना न्यायालयात न जाता त्यांना व्हॉटसॲप कॉलींगद्वारे सुनावणी घेऊन न्याय देण्याचे काम जिल्हा न्यायालयाने केले आहे.सन २०१७ मध्ये पुणे नाशिक महामार्गावर महेंद्र भिमाजी अडसरे (वय २४ वर्ष रा नारायणगाव ता.जुन्नर जि.पुणे) या तरुणाचा अपघाती मृत्यू झाला होता त्यानंतर या तरुणाच्या पत्नीने नुकसानभरपाई मिळविण्यासाठी राजगुरूनगर येथे जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला होता दिनांक २७ जुलै रोजी सुनावणीसाठी मृत व्यक्तीची पत्नी व मुलगा जिल्हा न्यायालयात हजर झाले मात्र त्या मयत तरुणाचे आई व वडील वृद्ध असल्यामुळे त्यांना न्यायालयात हजर होता आले नाही ही बाब लक्षात घेऊन पॅनलप्रमुख न्यायमूर्ती बी पी क्षिरसागर व ॲड.अतुल गुंजाळ यांना विनंती अर्ज करुन सदर व्यक्तीचे म्हणने ऐकून घेऊन या कुटुंबाला न्यायालयाने वीस लाख रुपये नुकसानभरपाई मंजूर केली सदर व्हॉटसॲप व्हिडिओ कॉलला अर्जदाराचे वकील ॲड. तुषार पाचपुते व जाब देणार नॅशनल इन्शुरस कंपणी यांचे वकील ॲड .अय्यर यांनी संमती दर्शविली व त्यास पॅनलप्रमुख मे.मोटार अपघात न्याय प्राधिकरण यांचे प्रमुख बी पी क्षिरसागर व ॲड अतुल गुंजाळ यांनी त्यास मान्यता दिली.

दौंड नगरपरिषद, दौंड, जिल्हा-पुणे
'ब' वर्ग नगरपरिषद

नगरपरिषद टाऊन हॉल व कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दौंड पुणे- ४१३८०१.

जा.क्रं. दौपप/पा.पु./२०२१/२०२४ दि. १/८/२०२४

पाणीपुरवठा विभाग
ई - निविदांतर्गत सुचना

दौंड नगरपरिषदेमार्फत पाणीपुरवठा विभागासाठी अमृत २/ नगरोत्थान या शासनाच्या होणाऱ्या योजनांचे प्रकल्प सविस्तर अहवाल, अंदाजपत्रके तयार करणे, याकरीता प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणेकरीता नोंदणीकृत केंद्रादाराकडून दोन लिफाफा पध्दतीने कार्यक्षेत्रील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत. कामांबाबत व ई-निविदेबाबत संपुर्ण माहिती खालील वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

१) http://mahatenders.gov.in
२) www.mahaetender.com

शिक्का

मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद, दौंड

राजगुरूनगरच्या विविध मागण्यांसाठी युवासेनेचा आंदोलनाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : युवासेना प्रमाप प्रमुख स्वप्निल रोहिदास राक्षे यांनी राजगुरूनगरच्या विविध मागण्यांसाठी राजगुरूनगर नगरपरिषद मुख्याधिकारी यांना आंदोलनाचा इशारा दिला आहे.

राक्षे यांनी प्रभाग क्रमांक २ मधील ओढा, नाला, संरक्षण भिंत दुरूस्तीबाबत व परिसर स्वच्छता, माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत प्रभाग २ मध्ये रंगरंगोटी करणेबाबत, एस.टी. स्टॅण्ड पासून आर्या स्ट्रिमपर्यंत पुर्व बाजूने झाडे लावून संवर्धन करणे व आर्या स्ट्रिमसमोरील विहीर पुनर्जिवित करणेबाबत आणि राक्षे इंग्लिश मिडियम शाळेकडे जाणाऱ्या रस्त्या संदर्भात योग्य उपाययोजना करणे असे विविध विषय अनेक दिवस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहेत.

याबाबत बोलताना राक्षे म्हणाले की, प्रभाग क्रमांक २ मध्ये असणारी संरक्षित भिंत ही पडलेली असून सदर भिंत ही दुरूस्त करून देण्यात यावी. या संरक्षित भिंतीबाबत प्रभाग क्रमांक २ मधील नागरिकांनी यापुर्वीही निवेदन दिलेले आहे. त्या निवेदनाचा विचार करण्यात यावा. तसेच माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत प्रभाग २ मधील आनंदनगर, सांडभोर वस्ती, रोकडे वस्ती, पडाळवाडी या परिसरामध्ये जिथे रंगरंगोटीसाठी जागा उपलब्ध आहे, तिथे रंगरंगोटी करण्यात यावी रस्ता खचलेला आहे चांगला रस्ता व्हावा. एस.टी. स्टॅण्ड पासून आर्या स्ट्रिमपर्यंत पुर्व बाजूने झाडे लावण्यात यावीत व त्याचे संवर्धन करण्यात यावे, त्यामुळे तेथील परिसर सुशोभित होईल. आर्या स्ट्रिमसमोरील विहीरीचे पुनर्जिवित करावी, त्यामुळे तेथील नागरिकांची पर्यायी पाण्याची व्यवस्था होईल.

नव युवामतदारांनी नावे १६ ऑगस्टपर्यंत नोंदवावी

उपजिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन नव युवामतदारांनी आपले नाव १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा स्वीप समन्वयक अर्चना तांबे यांनी केले आहे.

पुरंदर विधानसभाअंतर्गत भेकराईनगर येथील एसपी इन्फोसिटी कंपनी येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी मतदार नोंदणी अधिकारी बाळासाहेब ढवळे पाटील, निवडणुक नायब तहसीलदार संतोष सानप, कंपनीचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

श्रीमती तांबे म्हणाल्या, आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने अद्ययावत मतदार यादी तयार करण्यात येणार आहे. यादृष्टीने जिल्ह्यात सर्व विधानसभा मतदारसंघात विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. या मोहिमेत नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे.

या मोहिमेअंतर्गत मयत अथवा स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळणे, नावामध्ये किंवा पत्त्यात दुरुस्ती करणे आदी कार्यवाही करण्यात येत आहेत. नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने किंवा नजीकच्या मतदान केंद्रावर नाव नोंदणी करता येणार आहे. नवमतदार नावनोंदणीसाठी मतदारांनी अर्ज क्र. ६, मयत अथवा स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळण्याकरीता अर्ज क्र.७, आणि नावामध्ये किंवा पत्त्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता अर्ज क्र. ८ सादर करावा.

THIS IS A PUBLIC ANNOUNCEMENT FOR INFORMATION PURPOSES ONLY AND IS NOT A PROSPECTUS ANNOUNCEMENT. THIS DOES NOT CONSTITUTE AN INVITATION OR OFFER TO ACQUIRE, PURCHASE OR SUBSCRIBE TO SECURITIES. THIS PUBLIC ANNOUNCEMENT IS NOT INTENDED FOR PUBLICATION OR DISTRIBUTION, DIRECTLY OR INDIRECTLY OUTSIDE INDIA.

PUBLIC ANNOUNCEMENT

VISION INFRA EQUIPMENT SOLUTIONS LIMITED

Our Company was originally formed as a partnership firm in the name and style of "M/s Vision Infra" pursuant to a deed of partnership dated October 28, 2015 at Pune. Subsequently, "M/s Vision Infra" was converted from the partnership firm to a Public Limited Company under Part I of Chapter XXI of the Companies Act, 2013 in the name of "Vision Infra Equipment Solutions Limited" pursuant to a certificate of incorporation dated January 12, 2024, issued by the Registrar of Companies, Pune, Maharashtra bearing CIN: U77309PN2024PLC227226. For further details of Incorporation, change of name and registered office of our Company, please refer to chapter titled ***"History and Corporate Structure"*** beginning on page 127 of the Draft Red Herring Prospectus dated May 31, 2024 filed with the NSE Emerge.

(Please scan this QR code to view the DRHP)

Registered Office: Shop No 401-405, Bhawani, International BusinessBay, Bhavani Peth, Pune, Pune City, Maharashtra, India, 411042.
Contact Person: Dipali Rakesh Shah, Company Secretary & Compliance Officer, **Tel No:** +91 (020) - 26440999; **E-mail:** info@visioninfraindia.com
Website: www.visioninfraindia.com **Corporate Identity Number:** U77309PN2024PLC227226.

NOTICE TO INVESTORS ("NOTICE")

INITIAL PUBLIC OFFER OF UPTO 73,68,000 EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH (THE "EQUITY SHARES") OF VISION INFRA EQUIPMENT SOLUTIONS LIMITED ("OUR COMPANY" OR "VIESL" OR "THE ISSUER") AT AN ISSUE PRICE OF ₹ [●] PER EQUITY SHARE FOR CASH, AGGREGATING UP TO ₹ [●] LAKHS ("PUBLIC ISSUE").

**Our Company, in consultation with the Book Running Lead Managers, has undertaken a Pre-IPO Placement of 8,26,400 Equity Shares at an issue price of ₹138.00 per Equity Shares (including a premium of ₹128.00 per Equity Shares) for a cash consideration aggregating to ₹11,40,43,200/-, on July 31, 2024. The size of the Fresh Issue has been reduced by 8,26,400 number of equity shares and accordingly, the size of the Fresh Issue is up to 65,41,600 equity shares.*

Potential bidders may note the following:
Our Company, in consultation with the BRLMs, has undertaken the Pre-IPO Placement of 8,26,400 Equity Shares at an issue price of ₹138.00 per Equity Share (including a premium of ₹128.00 per Equity Share) for an amount aggregating to ₹ 11,40,43,200/-, by way of a private placement in accordance with Section 42, 62 of the Companies Act, 2013 read with the Companies (Prospectus and Allotment of Securities) Rules, 2014 and the Companies (Share Capital and Debentures) Rules, 2014, each as amended.
The Pre-IPO Placement has been undertaken pursuant to the approval of the Board and Shareholders in their meetings, held on July 17, 2024 and July 18, 2024 respectively.
The Company has allotted Equity Shares in the Pre-IPO Placement pursuant to the resolution passed by the Board in its meeting held on July 31, 2024, in the manner as set forth below:

Date of allotment	Number of Equity Shares allotted	Issue price per Equity Share (in INR)	Total consideration paid (in INR)	Name of the Allottee
July 31, 2024	91200	138	12585600	Founders Collective Fund
July 31, 2024	91200	138	12585600	India-Ahead Venture Fund
July 31, 2024	36800	138	5078400	Akarsh Pratish Mehta
July 31, 2024	36800	138	5078400	Hulashchand Shreepal Sablawat HUF
July 31, 2024	36800	138	5078400	R S Metals Private Limited
July 31, 2024	36800	138	5078400	Vedant Loyalka
July 31, 2024	36800	138	5078400	Vinod Kumar Lodha
July 31, 2024	36800	138	5078400	Vivek Kumar Jagwayan
July 31, 2024	18400	138	2539200	Abhay Kumar Chordia
July 31, 2024	18400	138	2539200	Abundantia Capital VCC- Abundantia Capital III
July 31, 2024	18400	138	2539200	Anju Sethia
July 31, 2024	18400	138	2539200	Anjuli Kothari
July 31, 2024	18400	138	2539200	Arti Sharma
July 31, 2024	18400	138	2539200	Ballabh Das Maheshwari
July 31, 2024	18400	138	2539200	BharatBhushan Agarwal HUF
July 31, 2024	18400	138	2539200	Bhupendra Kumar Dak

Date of allotment	Number of Equity Shares allotted	Issue price per Equity Share (in INR)	Total consideration paid (in INR)	Name of the Allottee
July 31, 2024	18400	138	2539200	Chandra Kala Malani
July 31, 2024	18400	138	2539200	Govind Prasad Lath
July 31, 2024	18400	138	2539200	Himika Bansal
July 31, 2024	18400	138	2539200	Kavita Jain
July 31, 2024	18400	138	2539200	Naresh Kumar Bhargava
July 31, 2024	18400	138	2539200	Pitam Goel HUF
July 31, 2024	18400	138	2539200	Purnima Ranka
July 31, 2024	18400	138	2539200	Raja Ram Ladha
July 31, 2024	18400	138	2539200	Rishi Karnawat
July 31, 2024	18400	138	2539200	Shine Star Build Cap Pvt Ltd.
July 31, 2024	18400	138	2539200	Swyom India Alpha Fund
July 31, 2024	18400	138	2539200	Umesh Kumar Jain
July 31, 2024	18400	138	2539200	Vicco Laboratories Goa through its partners Deep Yeshwant Pendharkar, Devesh Sumant Pendharkar, Amit Ashok Pendharkar
July 31, 2024	18400	138	2539200	Viney Equity Market LLP
July 31, 2024	18400	138	2539200	Vivek Lodha

Accordingly, pursuant to the Pre-IPO Placement, the size of the Fresh Issue has now been reduced to such number of Equity Shares aggregating up to 65,41,600 equity shares from 73,68,000 equity shares. The abovementioned allottee is not, in any manner, connected with the Company, the Promoters, members of the Promoter Group, the Directors, the Key Managerial Personnel, the Group Companies and their respective directors and key managerial personnel.
Please note that the Notice does not reflect all the changes that have occurred between the date of filing of the DRHP and the date hereof, and accordingly does not include all the changes and/or updates that will be included in the Red Herring Prospectus and the Prospectus.

BOOK RUNNING LEAD MANAGER TO THE ISSUE	REGISTRAR TO THE ISSUE
HEM SECURITIES LIMITED	**Link Intime India Private Limited**
904, A Wing, Naman Midtown, Senapati Bapat Marg, Elphinstone Road, Lower Parel, Mumbai-400013, India Tel. No.: +91- 022- 49060000; Fax No.: +91- 022- 22625991	C-101, 247 Park, L. B. S. Marg, Vikhroli (West), Mumbai – 400 083
Email: ib@hemsecurities.com	**Tel. No.:** +91 810 811 4949
Investor Grievance Email: redressal@hemsecurities.com	**Fax No.:** +91 22 49186195
Website: www.hemsecurities.com	**Email:** visioninfra.smeipo@linkintime.co.in
Contact Person: Roshni Lahoti	**Website:** www.linkintime.co.in
SEBI Regn. No. INM000010981	**Contact Person:** Shanti Gopalkrishnan
	SEBI Registration No.: INR000004058

All capitalized terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the DRHP.

For Vision Infra Equipment Solutions Limited
On behalf of the Board of Directors
Sd/-
Ms. Dipali Rakesh Shah
Company Secretary and Compliance Officer

Place: Pune, Maharashtra
Date: 01/08/2024

Vision Infra Equipment Solutions Limited is proposing, subject to applicable statutory and regulatory requirements, receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to undertake an initial public offering of its Equity Shares and has filed the DRHP dated May 31, 2024 with NSE Emerge. The DRHP is available on the website of NSE Emerge at https://nsearchives.nseindia.com/emerge/corporates/content/VisionInfraEquipmentSolutionsLtd DRHP.pdf, website of the Company at www.visioninfraindia.com and the websites of the BRLMs, i.e. HEM Securities Limited. Any potential investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and for details relating to such risk, please see the section entitled 'Risk Factors' of the RHP once available. Potential investors should not rely on the DRHP filed with NSE for making any investment decision.

This announcement has been prepared for publication in India and may not be released in the United States. This announcement does not constitute an offer of securities for sale in any jurisdiction, including the United States, and any securities described in this announcement may not be offered or sold in the United States absent registration under the US Securities Act of 1933, as amended, or an exemption from registration. Any public offering of securities to be made in the United States will be made by means of a prospectus that may be obtained from the Company and that will contain detailed information about the Company and management, as well as financial statements. However, no offering of securities is being made in the United States.